PDF Compressor Free Version

वाचले- १) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम ४४,४५

२) महाराष्ट्र जमिन महसूल (जमीनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९

३) श्री. राजेंद्र एकनाथ बोराडे व ई रा. बोराडे मळा, पंचक, नाशिकरोड, नाशिक यांचा दि. ४/६/२०१२ चा अर्ज.

४) सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग नाशिक यांचे पत्र क्र/एलएनडी/डब्लुएस/टेन्ट/०१/२०१२ दि. ३०/५/२०१२

५) उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २ नाशिक यांचे पत्र क्र/भूसं/क्र.२/कावि/८/२०१२ दि. ११/१/२०१२

६) अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, ना.ज.क.म. नाशिक यांचे पत्र क्र/यूएलसी/अ-२/२५५६/५४ दि. ३१/३/८६

७) या कार्यालयाचे पत्र क्र/मह/कक्ष/१५/गौखनि/१९४६/२०१० दि. ९/९/२०१०

---

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक.
क्र.मह/कक्ष-३/४/बि.शे.प्र.क्र/३०७/२०१२
नाशिक दिनांक १९ /१०/२०१२

**आदेश.**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ प्रमाणे व त्याखालील नियमान्वाये श्री. राजेंद्र एकनाथ बोराडे व ई रा. बोराडे मळा, पंचक, नाशिकरोड, नाशिक. यांना मौजे- पंचक. ता.जि. नाशिक येथील ग.नं/स.नं. ४६/३ब चे क्षेत्र ४८००.०० चौ.मी. - १७३.९७ चौ.मी. डी.पी.रोड. = ४६२६.०३ चौ.मी. (अक्षरी - चारहजार सहाशे सव्वीस पुर्णांक शुन्य तीन चौ.मी.) या क्षेत्रास **निवासी** या प्रयोजनासाठी परवानगी खालील अटी व शर्तीवर देण्यांत येत आहे.

अटी व शर्ती.

१) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६, महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अध्यादेश, १९९४, महाराष्ट्र जमिन महसूल (जमीनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी ) नियम १९६९ व त्याखालील नियमांना अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

२) परवानगी ज्या प्रयोजनासाठी देणेत आली आहे त्या व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी जमीनीचा वापर करता येणार नाही.

३) जमीनीवरील परवानगी देणेत आलेला अकृषिक वापर हा आदेशाच्या दिनांकापासून १ वर्षाच्या आत अर्जदाराने सुरु केला पाहिजे.असे न केल्यास उक्त मुदतीत जिल्हाधिका-यांनी वाढ केली नसल्यास दिलेली परवानगी व्यपगत झाल्याचे मानण्यात येईल.

४) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ कलम ११० किंवा यथास्थिती कलम ११४ अन्वये बदल केलेल्या वापरास अनुलक्षून ठरविण्यात येईल अशी बदलेली आकारणी देण्यास अर्जदार जबाबदार असेल.

५) जमीनीवर करण्यात येणारे बांधकाम हे स्थानिक नियोजन प्राधिकारी यांनी मंजूर केलेल्या आराखडयाप्रमाणेच करणे अर्जदारावर बंधनकारक आहे.

६) सदरहू परवानगी ही नागरी जमिन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतुदींना अधिन राहुन देण्यांत येत आहे.

७) अभिन्यासातील प्लॉटचे विभाजन अथवा एकत्रीकरण जिल्हाधिकारी यांचे पूर्व संमतीशिवाय करता येणार नाही.

८) जमिन व त्यावरील बांधकामाचा उपयोग ज्या कारणासाठी अकृषीक परवानगी दिली आहे त्याच कारणासाठी करणे बंधनकारक आहे. तसेच सदरहू जमिनीची किंवा सदरहू जमिनीपैकी काही भागाचा अथवा त्यावरील बिल्डींगचा अथवा बांधकामाचा उपयोग दुस-या कारणासाठी करावयाचा झाल्यांस यास जिल्हाधिकारी, नाशिक यांचो लेखी पूर्व संमती घ्यावी. याच कारणासाठी बिल्डींगचा उपयोग हा संपूर्ण जमिनीचा उपयोग म्हणून मानण्यांत येईल.

९) परवानादार यांनी जमिनीची सुधारणा, मंजूर लेआऊट प्रमाणे म्हणजे रस्ते, ड्रेनेज इत्यादी बाबी पूर्ण करून खुली जागा व रस्ते महानगरपालिका नाशिक यांचेकडे हस्तांतरीत करावी.

**१०) महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अध्यादेश,१९९४ कलम ६ नुसार परवानादार यांना लेआऊटमधील प्लॉटची मोजणी व रेखांकन भूमी अभिलेख विभागाकडून करुन घेऊन खुली जागा व रस्ते महानगरपालिका नाशिक/मुख कार्यकारी अधिकारी, देवळाली कॅन्टोनमेंट बोर्ड यांचेकडे हस्तांतरीत केलेनंतर या कार्यालयाकडून सनद मंजूर करून घेणे बंधनकारक आहे. तोपावेतो अभिन्यासातील प्लॉटची विक्री करता येणार नाही.**

११) सदरची परवानगी महानगरपालिका नाशिक यांचेकडील अभिन्यास/बांधकाम नकाशा मंजुरीचे पत्रामधील सर्व अटी व शर्तीस अधिन राहुन देण्यांत येत आहे.

१२) परवानादार यांनी संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडून बांधकामाची परवानगी घेतल्यावरच बांधकामास सुरुवात करावी.

१३) ज्या ठिकणी सक्षम नियोजन अधिकारी नाही, अशावेळी परवानदार यांनी महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी) नियम १९६९ अनुसूची-३ प्रमाणे प्लॅन तयार करुन तो जिल्हाधिकारी यांचेकडून मंजूर करुन त्याप्रमाणे बांधकाम करावे.

१४) मुंबई महामार्ग अधिनियम १९५ प्रकरण ३ लागू नसलेल्या जमीनींच्या बाबतीत महाराष्ट्र जमिन महसूल (जमीनीच्या वापरात बदल अकृषीक आकारणी) नियम १९६९ अनुसुची- २ मध्ये नमूद केलेप्रमाणे प्रमाणे रस्त्याची सिमा व इमारतीची रांग यामधील व इमारतीची रांग व नियंत्रण रेषा यामधील इमारतींच्या बांधकामासाठी नमूद केलेल्या तरतुदींचे पालन करणे परवानादावर बंधनकारक आहे.

१५) परवानादर यांनी अकृषीक प्रयोजनाकरीता जमिनीचा उपयोग सुरु केल्याबाबत अथवा उपयोगात बदल केल्याबाबत एक महिन्याचे आंत संबंधित तलाठी/तहसिलदार/जिल्हाधिकारी नाशिक यांना कळवावे. अन्यथा परवानादार यांचेविरुध्द महाराष्ट्र जमिन महसूल (जमीनीच्या वापरात बदल अकृषीक आकारणी) नियम १९६६ नियम ६ प्रमाणे दंडात्मक कारवाई करणेत येईल.

१६) परवानादार यांनी जमिनीचा अकृषिक सारा दर चौ.मि.ला रु. ०.३० पै निवासी या प्रमाणे भरावा. तसेच सदर अकृषक सारा हा शासनाने सन २०११ ते २०१६ या कालावधीचा सुधारीत अकृषिक प्रमाणदर निश्चित केलेनंतर येणा-या फरकाची रक्कम भरणे बंधनकारक असेल या अटीवर सदरची परवानगी देण्यांत येत आहे.

PDF Compressor Free Version

१७) तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, यांनी जमिनीची मोजणी केलेनंतर मोजणीप्रमाणे जमिनीचे क्षेत्रात व अकृषिक सा-यात बदल झाल्यास त्याप्रमाणे क्षेत्र बदल होत असल्यास या कार्यालयाची परवानगी घेणे आवश्यक असेल.

१८) परवानादार यांनी बिल्डींग व इत्यादी बांधकामे पूर्ण केल्यानंतर त्यामध्ये वाढीव बांधकाम किंवा बांधकामामध्ये बदल जिल्हाधिकारी/ सहाय्यक संचालक नगररचना/ महानगर पालिका/ नगर पालिका यांचेकडून नवीन बांधकाम नकाशे मंजूर करुन घेतल्याशिवाय करु नये.

१९) परवानादार यांचेवर महाराष्ट्र जमिन महसूल (जमीनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९ चे अनुसूचि ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या शर्ती व नमुन्यामध्ये सदर बिनशेती उपयोग सुरु केल्यापासून एक महिन्याचे आंत करुन देण्यांचे बंधनकारक राहील.

२०) परवानादार यांचेकडून या आदेशात नमूद केलेल्या शर्तीचा अथवा सनदेमध्ये नमूद केलेल्या शर्तीचा भंग केल्यांस महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमान्वये जिल्हाधिकारी जो दंड व सारा फर्मावतील तो भरणे परवानादार यांचेवर बंधनकारक असेल.

२१) जिल्हाधिकारी यांना या परवानगीतील अटी व शर्तीविरुध्द बिल्डींग व इतर बांधकामे केलेले आढळून आल्यांस किंवा ते वाढवून किंवा त्यामध्ये बदल केलेले आढळून आल्यास ते ठराविक मुदतीत काढून टाकण्यांस फर्मविण्याचा कायदेशिर अधिकार राहील व सदरहू मुदतीत परवानादार यांचेकडून जमिन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल केली जाईल.

२२) सदरहू परवानगी मुंबई कुळ वहीवाट व शेतजमीन कायदा १९४८ , नागरी कमाल जमीन मर्यादा कायदा १९७६ , मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतूदींस अधिन राहून देण्यांत येत आहे.

२३) अधिकारी अभिलेख व जमिनीच्या मालकी हक्काबाबत भविष्यात काही विवाद उदभवल्यास व त्यामध्ये तथ्य आढळल्यास तसेच मालकी हक्काबाबत काही गंभीर स्वरुपाच्या कायदेशिर त्रृटी आढळल्यांस त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

**२४) वरील प्रमाणे अटी व शर्ती यांचे पालन झाले आहे किंवा नाही, प्रत्यक्ष भूखंडावर उच्च दाबाची वाहिनी लाईन गेली किंवा कसे व जागेवर सदर परवानगी देण्यापूर्वीच बांधकाम झाले आहे किंवा काय व विकास कर्त्याने, अर्जदाराने यापूर्वी बिनशेती परवानग्या घेतल्या असतील तर त्यातील अटी- शर्तीचे पालन केले आहे किंवा नाही याबाबत स्थळ पाहणी करण्यांत येणार आहे. अशा स्थळपाहणीत अटी- शर्तीचा भंग झाल्याचे निष्पन्न झाले (पूर्वीच्या परवानग्यांसहीत) तर सदर परवानगी रद्द होण्यास पात्र राहील.**

**२५) स्थानिक प्राधिकरणास खुली जागा,**

**२६) रस्ते यासाठीचे क्षेत्र हस्तातरीत झाले नसल्याचे आढळून आल्यास ही परवानगी तसेच पूर्वीची परवानग्या रद्द होण्यास पात्र राहतील.**

२७) बांधकामासाठी लागणा-या विटामध्ये फ्लायअॅशव्दारे तयार करण्यात आलेल्या विटांचा वापर नियमितपणे करावा.

स्वाक्ष प्रतिवर मा.जिल्हाधिकारी सो यांची
स्वाक्षरी आहे.

जिल्हाधिकारी नाशिक करिता

**प्रति-** श्री. राजेंद्र एकनाथ बोराडे व ई रा. बोराडे मळा, पंचक, नाशिकरोड, नाशिक

प्रतिलिपीने- मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिकरोड यांचेकडेस माहितीसाठी सविनय सादर.

प्रत- मुळ कागदपत्र पान नं. १ ते ७५ सह तहसिलदार नाशिक यांचेकडेस माहितीसाठी व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२/- त्यांना विनंती करण्यांत येते की, परवानादार यांनी अकृषिक प्रयोजनाकरीता जमिनीचा वापर केल्याबाबत लक्ष ठेवावे. परवानादार यांनी मौजे- **पंचक.** चे गटातील क्षेत्राचा अकृषिक प्रयोजनाकरीता जमिनीचा वापर सुरु केल्याबाबत कळविल्यानंतर तालुका फॉर्म. नंबर ०२, गा.न.नं. २ अकृषिक प्रयोजन नोंदवहीमध्ये बिनशेती सा-याबाबत योग्य ती नोंद घ्यावी. परवानादार यांनी अकृषिक प्रयोजनाकरीता वापरलेल्या तारखेपासून वसूल करण्याचे दृष्टीने काळजी घ्यावी व योग्य त्या नमुन्यामध्ये सनद करुन घ्यावी. **तसेच अट क्र १० मध्ये नमूद केलेनुसार या कार्यालयाकडून नमुना अनुसुची चार किंवा पाच मधील मंजूर सनद प्राप्त झालेशिवाय प्रस्तुत जमीनीचे बिनशेती प्लॉटचे ७/१२ तयार करू नयेत.**

प्रत- १) तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी.

२) सहाय्यक संचालक नाशिक महानगरपालिका /मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर देवळाली कॅन्टोनमेंट बोर्ड देवळाली.

३) उपविभागीय अधिकारी, नाशिक उपविभाग नाशिक.

**४) कामगार तलाठी- नाशिक. ता.जि.नाशिक. / अट क्र १० मध्ये नमूद केलेनुसार या कार्यालयाकडून नमुना अनुसुची चार किंवा पाच मधील मंजूर सनद प्राप्त झालेशिवाय प्रस्तुत जमीनीचे बिनशेती प्लॉटचे ७/१२ उतारे स्वतंत्र करु नयेत.**

टिप- परवानादार यांनी रुपांतरीत कराची रक्कम रुपये- ६,९४०/- (अक्षरी- सहाहजार नऊशे चाळीस रु मात्र. ) सरकारी खजीन्यांत दि. २५/८/२०१२ व मोजणी फी रु- ६०,०००/- (अक्षरी- साठहजार रु मात्र.) सरकारी खजीन्यांत दि. २०/९/२०१२ रोजी भरुन तशी चलने हजर केली आहेत.

जिल्हाधिकारी नाशिक करिता

PDF Compressor Free Version



abc
AJIT BANE CONSTRUCTIONS

Date: - 01/06/2017

# Whom it may Concern

The Title of Land Sr. No. 46/3B, Shivar Panchak, Nasik is clear, and there is no Litigation and Encumbrance.

I have already uploaded the Commencement Certificate. Hence I have mentioned the No. of Commencement Certificate. It is LND/BP/C4/34 Dated 18/06/2016 Sanction Building Plan Scanned Copies are uploaded to your Record.

Sr. No. 46/3B, Shivar Panchak, Nasik is Piece of Land and Converted into Non Agriculture (N.A.) so the said land is not converted in Layout.

Thanking You,

..................................

(Ajit S Bane)

Proprietor

Chittaranjan Society, Saikheda Road, Dasak, Nashik Road
ajitbane.abc7@yahoo.in